आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१२ ऑगस्ट २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- हिंडेनबर्ग रिसर्चने केलेले आरोप सेबी म्हणजे भारतीय रोखे आणि विनिमय मंडळानं फेटाळले

- गुंतवणूकदारांना हिंडेनबर्ग आणि काँग्रेसचं कारस्थान लक्षात आलं असल्याने शेअर बाजारावर त्याचा परिणाम झालेला नाही, असा भाजपाचा दावा

- आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा जास्त वाढवण्यासाठी आपला पाठिंबा राहील असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांचं प्रतिपादन

- राज्यात पावसाची विश्रांती , मात्र विविध धरणांमधून विसर्ग सुरु

**आणि**

- महिलांसाठीची पहिली जागतिक कबड्डी स्पर्धा येत्या सप्टेंबरमधे हरियाणात होणार

**<><><><><>**

हिंडेनबर्ग रिसर्चने केलेले आरोप सेबी म्हणजे भारतीय रोखे आणि विनिमय मंडळानं फेटाळले असून या पार्श्वभूमीवर शांत चित्ताने प्रतिक्रिया द्यावी, असं आवाहन गुंतवणूकदारांना केलं आहे. हिंडेनबर्ग रिसर्चनं केलेल्या आरोपांचं खंडन केलं आहे. हितसंबंधांमुळे निर्माण होणारे पेचप्रसंग हाताळण्यासाठी सेबीकडे पुरेसे नियम आणि सक्षम अंतर्गत यंत्रणा असल्याचं सेबीने म्हटलं आहे. वैयक्तिक मालकीचे समभाग आणि इतर मुद्द्यांवर सेबी अध्यक्षांनी वेळोवेळी जाहीर खुलासे

केले असून, हितसंबंधांचा पेच उद्भवेल अशा प्रकरणांमधून नेहमीच स्वतःला दूर ठेवलं आहे. हिंडेनबर्ग रिसर्चने अदानी समूहाविरुद्ध केलेल्या आरोपांची सेबीने निःपक्षपाती आणि नियमानुसार  चौकशी केली असून देशाच्या भांडवली बाजारांची विश्वासार्हता आणि विकास याप्रति वचनबद्ध असल्याची ग्वाही सेबीने दिली आहे.दरम्यान हिंडेनबर्गच्या आरोपांचा प्रतिवाद करताना सेबी अध्यक्ष माधवी पुरी-बुच यांनी अनेक बाबी स्वीकारल्या असून त्यामुळे त्यांच्याविषयी नवे प्रश्न निर्माण झाले असल्याचं ट्विट आज हिंडेनबर्गने केलं आहे.

**<><><><><>**

अदानी समूहानंही हिंडेनबर्गनं केलेले सर्व आरोप फेटाळले आहेत. आपल्या समूहावर या अमेरिकन कंपनीने केलेले हे सर्व आरोप काल्पनिक आणि दुर्भावनापूर्ण आहेत, तसच त्यांच्या वैयक्तिक फायद्याच्या दृष्टीने केले आहेत, अशी प्रतिक्रिया अदानी समूहाने दिली आहे. या आरोपांबाबत या आधीच चौकशी झाली असून सर्वोच्च न्यायालयानं ते फेटाळले आहेत, असंही अदानी समूहाने म्हटलं आहे. सेबीच्या अध्यक्ष माधवी पुरी बुच आणि त्यांचे पती धवल बुच यांच्याविरोधातील हिंडेनबर्ग अहवालाचा भारतीय म्युच्युअल फंड्स संघटनेनं निषेध केला आहे. भारताच्या गतिमान अर्थव्यवस्थेत खोडा घालण्याच्या उद्देशानं हिंडेनबर्ग संस्था अनावश्यक अविश्वासाचं वातावरण तयार करत असल्याचं संघटनेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशाची अर्थव्यवस्था वेगाने प्रगती करत असून शेअर बाजार पूर्णपणे मजबूत असल्याचं भाजपा नेते रविशंकर प्रसाद यांनी म्हटलं आहे. गुंतवणूकदारांना हिंडेनबर्ग आणि काँग्रेसचं कारस्थान लक्षात आलं असल्यानं शेअर बाजारावर त्याचा परिणाम झालेला नाही, असा दावा त्यांनी आज दिल्लीत पत्रकार परिषदेत केला.

अशा अफवांच्या माध्यमातून देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याचा विरोधकांचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यातल्या कावड यात्रेत आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी होत आहेत. कळमनुरी इथल्या चिंचाळेश्वर महादेव मंदिरापासून ते हिंगोली शहरातल्या ओम कयाधू अमृतधारा महादेव मंदिरापर्यंत आमदार संतोष बांगर यांच्या नेतृत्वाखाली ही कावड यात्रा आयोजित करण्यात आली आहे.

**<><><><><>**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी ज्या जिल्ह्यात विधानसभा क्षेत्र विकास समिती गठीत झाली नाही, किंवा समितीकडून पात्र लाभार्थ्यांची यादी अंतिम झाली नाही, अशा जिल्ह्याची यादी जिल्हाधिकाऱ्यांनी पुढच्या कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठवावी, अशा सूचना राज्य शासनानं दिल्या आहेत. यासाठी विधानसभा क्षेत्र समितीची मान्यता घेण्यात समस्या असतील, तर जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांची मान्यता घ्यावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

**<><><><><>**

महसूल पंधरवड्यानिमित्त नांदेड इथं काल एक धाव सुरक्षेची ही मिनी मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय इथं हिरवा झेंडा दाखवून या रॅलीची सुरुवात केली. विविध आपत्ती संदर्भात युवकांमध्ये जनजागृती व्हावी आणि त्यांनी सुरक्षिततेचे नियम पाळावे या हेतूने या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. जिल्ह्यातल्या अनेक शाळा - महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला होता.

**<><><><><>**

प्रधानमंत्री पिक विमा योजनेचे लाभार्थी असणाऱ्या नांदेड जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये नुकसान भरपाईची रक्कम २० ऑगस्ट पर्यंत जमा केली जाणार आहे. आतापर्यंत ११९ कोटी रुपये जमा झाले आहेत. ज्या शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पीक विमा जमा झाला नसेल, त्यांनी २० ऑगस्टनंतर तालुकास्तरीय कार्यालयात चौकशी करावी, असं आवाहन कृषी विभागाने केलं आहे.

**<><><><><>**

देशांतर्गत हातमाग आणि हस्तशिल्पांची विक्री आणि निर्यात वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात असल्याचं केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत सुरू असलेल्या हातमाग प्रदर्शनात बोलत होते.

यावेळी सिंह यांनी उपस्थितांना हर घर तिरंगा मोहिमेचा भाग म्हणून राष्ट्रध्वजाचे वाटप केलं आणि मोहिमेत सहभागी होण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेते सुमीत राघवन म्हणाले…

**होल्ड--बाईट - सुमीत राघवन**

**<><><><><>**

महाराष्ट्रात आरक्षणा संबंधाने दोन समाजात कटुता निर्माण होणार नाही, याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी, यासाठी मुख्यमंत्र्यांनी सर्वपक्षीय बैठक बोलावून यावर

तोडगा काढावा असं राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटलं आहे. ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. राज्यातलं सामाजिक वातावरण व्यवस्थित ठेवण्याची काळजी सर्वांनी घ्यायला हवी असं आपल्याला वाटतं, यासाठी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांना सर्वपक्षीय बैठक बोलावून तोडगा काढण्याविषयी सुचवलं, असं पवार म्हणाले. राज्यात सौहार्द निर्माण करण्यासाठी या बैठकीत एकमताने जो निर्णय होईल तो आपल्याला मान्य असेल असंही पवार यांनी सांगितलं.

आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यापेक्षा जास्त वाढवता येणार नाही हा न्यायालयाचा निर्णय आहे. त्यामुळे राज्यातल्या सर्व पक्षांनी मतभेद विसरून केंद्र सरकारकडे आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी करावी, आरक्षणाची मर्यादा वाढवल्यास आपल्या पक्षाचा याला पाठिंबा असेल, असंही पवार म्हणाले.

**<><><><><>**

बडतर्फ प्रशासकीय अधिकारी पूजा खेडकर यांना २१ ऑगस्टपर्यंत अटक न करण्याचे आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्ली पोलिसांना दिले आहेत. नागरी सेवा परीक्षा फसवणूक करून उत्तीर्ण झाल्याचा आरोप करत दिल्ली पोलिसांनी खेडकर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. त्यांच्या जामिन अर्जावर न्यायालयानं दिल्ली पोलिस आणि केंद्रीय लोकसवा आयोगाकडून उत्तर मागवलं आहे.

**<><><><><>**

महसूल गुप्तचर संचालनालयानं काल नागपूर इथं मेफेड्रोन कारखान्यावर छापा टाकून सुमारे ७८ कोटी रुपये किमतीचं ५२ किलो मेफेड्रोन जप्त केले. यासोबत कच्चा माल आणि उपकरणं देखील जप्त करण्यात आली आहेत. शहरातल्या एका निर्माणाधीन इमारतीत मेफेड्रोनचं उत्पादन सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी चौघांना अटक

करण्यात आली असून, महसूल गुप्तचर संचालनालयाच्या कोठडीत पाठवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्यात पावसाचा जोर काहीसा ओसरला, तरी विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. सिंचन प्रकल्पांच्या पाणलोट क्षेत्रांमध्येही चांगला पाऊस झाल्याने जलसाठ्यात वाढ झाली आहे. सध्या विदर्भातल्या सहा मोठ्या प्रकल्पांमधून विसर्ग सुरू आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातल्या **उर्ध्व वर्धा, यवतमाळ** जिल्ह्यातल्या **बेंबळा, नागपूर** जिल्ह्यातल्या पेंच तोतलाडोह, गोंदिया जिल्ह्यातल्या इटियाडोह, भंडारा जिल्ह्यातल्या गोसीखुर्द, आणि वर्धा जिल्ह्यातल्या निम्न वर्धा प्रकल्पांचा समावेश आहे. वैनगंगा, वर्धा आणि बेंबळा नदीकाठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. नागपूर विभागातल्या मोठ्या प्रकल्पांमध्ये ७४ पूर्णांक ११ टक्के, तर अमरावती विभागातल्या प्रकल्पांमध्ये ६० पूर्णांक १२ टक्के पाणीसाठा झाला आहे. **अहमदनगर** जिल्ह्यातल्या मुळा धरणाची पाणी पातळी वाढल्यानं आज धरणातून दोन हजार घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये आवश्यकता भासल्यास मुळा धरणातून नदीपात्रामध्ये टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढवण्यात येणार असून, नदीकाठच्या गावांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन पाटबंधारे विभागानं केलं आहे.

**<><><><><>**

महिलांसाठीची पहिली जागतिक कबड्डी स्पर्धा येत्या सप्टेंबरमधे हरियाणात होणार असून, त्यात १५ देशांचे संघ सहभागी होणार आहेत. जागतिक स्तरावर कबड्डी खेळाला महत्त्व प्राप्त व्हावं, या खेळाचा ऑलिंपिक स्पर्धेमध्ये समावेश व्हावा आणि २०३६ मध्ये भारतामध्ये ऑलिंपिक स्पर्धांचं आयोजन करण्याच्या दृष्टीने

भारताच्या दाव्याला पाठबळ मिळावं, या उद्देशाने भारतात हरियाणामध्ये या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. होलिस्टिक इंटरनॅशनल प्रवासी स्पोर्ट्स असोसिएशनच्या सहकार्याने या स्पर्धा भरवण्यात येणार असून त्यासंदर्भात हरयाणा सरकारने एक समझोता करार नुकताच केला.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत महिला कुस्तीगीर विनेश फोगट अंतिम सामन्यासाठी अपात्र ठरल्याप्रकरणी वैद्यकीय पथकाचे प्रमुख डॉ. दिनशॉ पारडीवाला यांना जबाबदार धरता येणार नाही असं भारतीय ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्ष पी. टी . उषा यांनी म्हटलं आहे. कुस्ती, मुष्टियुद्ध, आणि ज्युदो अशा क्रीडाप्रकारांमधे प्रत्येक खेळाडूच्या वजन, फिटनेस इत्यादीची काळजी त्यांच्या वैयक्तिक प्रशिक्षक पथकानं घ्यायची असते, असं त्यांनी काल प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. डॉ. पारडीवाला यांची जबाबदारी खेळाडूला दुखापत झाल्यास त्यावर उपचार करुन सत्वर खेळायला तयार करण्यात मदत करण्याची आहे, असं उषा यांनी स्पष्ट केलं.

**//<><><><><>//**